अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचे कार्यालय
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई–३०.
Tel.: २४९ १२ १२ (Ex.112), Toll Free No. १०६४
E:addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
W:www.acbmaharashtra.org
दि. ०५/०४/२०२४

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गु.नों.क्र. | १२/२०२४ |
| कलम | ७, १२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| फिर्यादी | एक पुरूष, ५५ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालयाचा पत्ता. | १) श्री. मंगेश चंद्रकांत कांबळी, ३७ वर्षे, कनिष्ठ अभियंता,(इमारत व कारखाने)<br>२) श्री. सुरज शिवाजीराव पवार, ४३ वर्षे, दुय्यम अभियंता, (इमारत व कारखाने)<br>दोन्ही नेमणूक– इमारत व कारखाने विभाग, सी वार्ड, मनपा, चंदनवाडी,मरीन लाईन्स, मुंबई – ४०० ००२<br>३) श्री. निलेश जयंती होडार (खाजगी इसम), ३७ वर्षे, धंदा– समाजसेवा, रा.ठि. ३/६८, नाखुदा चाळ, चंदनवाडी, मरीन लाईन्स, मुंबई ४०००२ |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रू. २०,००,०००/– |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रू. ८,०० ,०००/– ( रू.५००/– दराच्या २०० भारतीय चलनी नोटा व रू. ५००/– दराच्या १४०० खेळण्यातील खोटया नोटा ) |
| थोडक्यात हकिकत | यातील फिर्यादी यांची पार्टनरशिप मध्ये असलेल्या बिल्डींगच्या पाचव्या मजल्यावरील पोटमाळयाच्या अनधिकृत बांधकामावर निष्काशनाची कारवाई करण्याकारीता नोटीस बजावण्यात आली होती. सदर नोटीसचे अनुषंगाने फिर्यादी हे लोकसेवक यांना भेटण्यासाठी गेले असता लोकसेवक १ व २ यांनी फिर्यादी यांचेकडे सदर पोटमाळयाचे व टेरेसवरील पत्राचे शेडचे अनधिकृत बांधकामावर निष्कासनाची कारवाई न करण्याकरीता रू. २०,००,०००/– लाचेची मागणी केली. परंतु तक्रारदार यांना लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाप्रवि कार्यालयात दिनांक ०४/०४/२०२४ रोजी तक्रार अर्ज केला.<br>फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून दिनांक ०४/०४/२०२४ रोजी पडताळणी केली असता, आरोपी लोकसेवक १ व २ यांनी टेरेस वरिल शेडचे रू. १५,००,०००/– व पाचव्या मजल्यावरील अनधिकृत कामाचे रू.५,००,०००/– असे एकुण रू. २०,००,०००/– लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झालेने आज दिनांक ०५/०४/२०२४ रोजीच्या सापळापुर्व/सापळा आयोजीत केलेल्या सापळा कारवाईमध्ये आरोपी लोकसेवक १ व २ यांनी श्री. निलेश जयंती होडार (खाजगी इसम) यास फिर्यादी यांचेकडून लाचेच्या रक्कमेचा पहिला हप्ता स्विकारण्यास पाठविले त्यावेळी निलेश होडार यास आरोपी लोकसेवक १ व २ यांचेवतीने रू. ८,००,०००/– लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले. |

मार्गदर्शक अधिकारी – श्री. विजय पाटील, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. भागवत सोनावणे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

(नितीन दळवी)
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग,९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.
टोल फ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२–२४९२१२१२.
फॅक्स क्र. ०२२–२४९२२६१८,
वेबसाईट–acbmaharashtra.gov.in, ईमेल acbwebmail@mahapolice.gov.in,
ईमेल addlcpacbmumbai@mahapolice.gov.in, फेसबुक www.facebook.com - Maharashtra ACB.
मोबाईलॲप www.acbmaharashtra.net